# MEDIA CORNER 2021-22

## SHRIRAM KALA MAHILA MAHAVIDYLAYA,DHAMANGAON RLY

### ज्ञानगंगेचा वापर समाजकार्यासाठी करा

**अरुण अडसड यांचे भावपूर्ण आवाहन**

**पदवी वितरण समारंभ**



पदवी वितरित करताना अरुण अडसड व उपस्थित मान्यवर

◆ धामणगाव रेल्वे, २१ जुलै

जन्मदात्याची साथ, महाविद्यालयातील सर्वोत्तम शिक्षण, आपले अथक परिश्रम यामुळे आज पदवी मिळाली असली, तरी ज्ञानगंगेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी करा. आई-वडिलांचे किंचित उपकार फेडण्याच्या उद्देशाने आपली पदवी आई-वडिलांच्या चरणी अर्पण करा, असे भावनिक आवाहन माजी आमदार तथा श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुण अडसड यांनी केले. जीवनात कितीही मोठे झाले असले तरी आई-वडिलांपेक्षा मोठे नाही हे सदैव लक्षात ठेवा, तसेच आपल्या जीवनात स्वामी विवेकानंद, फुले, शिवाजी, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, शहीद भगतसिंग सारख्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवा, असेही यावेळी अडसड म्हणाले.

श्रीराम शिक्षण संस्था अंतर्गत येणाऱ्या श्रीराम महिला कला महाविद्यालय व स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील एमए मराठी, बीए, बीपीएड, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील अशा सन २०२०- २१ या सत्रातील ५२ विद्यार्थ्यांचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ३७ वा दीक्षांत समारंभ तथा पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षस्थानी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार अरुण अडसड तर प्रमुख अतिथी श्रीराम शिक्षण संस्थेचे सचिव घनश्याम मेश्राम, संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या पीएचडी व नामांकन विभागाच्या सहाय्यक कुलसचिव मीनल मालधुरे, संचालक सुभाष देशमुख, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकिशोर राऊत, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य हर्षल मालधुरे, स्व. नंदलाल लोया व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य, माजी नगराध्यक्ष अर्चना राऊत यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक श्रीराम महिला महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकिशोर राऊत, संचालन प्रा. राजेश आडे तर आभार प्रदर्शन प्रा. योगेश काशीकर यांनी केले. या प्रसंगी प्रा. नितीन बिहाडे, डॉ. सुधीर पाथरे, डॉ. निता केने, प्रा. अभिजित दोड, डॉ. मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजकुमार मिष्या, राजेश मारवे, नागोराव पाचबुद्धे, संतोष सिसोदे, शरद गवारले, कल्पना चव्हाण, प्रफुल्ल कांबळे, मयुरी गभाने, मेश्राम कुटे प्रामुख्याने उपस्थित होते.

**डॉ. गणेश टाले यांना श्रद्धांजली**

यावेळी श्रीराम महिला महाविद्यालयाचे स्व. प्राचार्य डॉ. गणेश टाले यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या महाविद्यालयाकरिता डॉक्टर टाले यांचा सिंहाचा वाटा असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अरुण अडसड म्हणाले.

◂(तभा वृत्तसेवा)

लोकमत

### श्रीराम कला महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**धामणगाव रेल्वे :** श्रीराम महिला महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिनी संस्थेचे उपाध्यक्ष संजय राठी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी सचिव घनश्याम मेश्राम, प्रमोद मुंदडा, किशोर साकुरे, विलास कट्टू, प्राचार्य नंदकिशोर राऊत उपस्थित होते. विशेष प्रावीण्यप्राप्त विद्यार्थिनींना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्राचार्य अर्चना राऊत व हर्षद मलधुरे, मुख्याध्यापिका गावंडे यांनी परिश्रम केले. सुधीर पाथरे, योगेश काशीकर, राजेश आडे, प्राध्यापक अभिजित दोड, नितीन बिहाडे, नीता केने, मोनाली इंगळे, संजय बाळापुरे यांच्यासह संस्थेचे कर्मचारी आणि प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Amravati
Page No. 3 Jan 28, 2022
Powered by: erelego.com

**लोकमत**

# ज्ञानगंगेचा वापर समाजकार्यासाठी करा

## अरुण अडसड, पदवी वितरण समारंभ



माजी आमदर अरुण अडसड यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना विद्यार्थी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**धामणगाव रेल्वे :** जन्मदात्याची साथ, महाविद्यालयातील सर्वोत्तम शिक्षण, आपले अथक परिश्रम यामुळे आज पदवी मिळाली असली तरी ज्ञानगंगेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी करा, जीवनात आपले आदर्श ठरवा, असे मत माजी आमदार कथा श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुण अडसड यांनी व्यक्त केले.

श्रीराम शिक्षण संस्था अंतर्गत येणाऱ्या श्रीराम महिला कला महाविद्यालय व स्व. दादाराव अडसड शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील एमए मराठी, बीए, बीपीएड, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील अशा सण २०२०-२१ या सत्रातील ५२ विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा विद्यापीठाचा ३७ वा दीक्षांत समारंभ तथा पदवी वितरण समारंभ आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी अरुण अडसड होते. प्रमुख अतिथी सचिव घनश्याम मेश्राम, संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या पीएचडी व नामांकन विभागाच्या सहायक कुलसचिव मीनल मालधुरे, संचालक सुभाष देशमुख, प्राचार्य नंदकिशोर राऊत, बीपीएड कॉलेजचे प्राचार्य हर्षल मालधुरे, प्राचार्य अर्चना राऊत उपस्थित होते. जिल्ह्यात सर्वाधिक विद्यार्थिनी या श्रीराम महिला महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत, असेही अडसड म्हणाले. प्रास्ताविक प्राचार्य नंदकिशोर राऊत, संचालन राजेश आडे व आभार प्रदर्शन योगेश काशीकर यांनी केले.

Hello Amravati
Page No. 2 Aug 01, 2021
Powered by: erelego.com

# श्रीराम महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिन

◆ **धामणगाव रेल्वे, ६ फेब्रुवारी**

स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये नुकताच राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन व राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीराम शिक्षण संस्थेचे सचिव घनश्याम मेश्राम तर अतिथी म्हणून प्राचार्य हर्षद मालधुरे, प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, प्रा. अभिजित दोड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. भारत हा जगामधील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. भारतामध्ये ९५ कोटी पेक्षा अधिक मतदार आहेत.

या सर्वांना मतदार यादी मध्ये सामावून घेण्याचे कार्य निवडणूक आयोग करीत असतो. म्हणून निवडणूक आयोगाच्या कार्याची जाणीव व्हावी आणि मतदारांमध्ये लोकशाहीबद्दलचे प्रेम, मतदानाचा अधिकार, त्याची अंमलबजावणी आणि मतदानाचे प्रमाण वाढावे, याकरिता संपूर्ण भारतामध्ये लोकशाहीचा उत्सव म्हणून राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण भारतामध्ये साजरा केला जातो. याच पृष्ठभूमीवर महाविद्यालयांमध्ये देखील विविध उपक्रमांअंतर्गत मतदार नोंदणी, मतदार जनजागृती केली जात असते. म्हणून निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा देखील घेतल्या जातात. यावर्षीचा विशेष उपक्रम म्हणजे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपल्या घरासमोर मतदान जनजागृती रांगोळी काढून धामणगाव तालुक्यामधील अनेक गावांमध्ये मतदार जनजागृतीचे आणि मतदानाच्या प्रचाराचे कार्य केले . सोबतच महाविद्यालयांमध्ये सर्व अतिथी आणि कर्मचाऱ्यांनी मतदानाची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाइन सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख नितीन बिहाडे यांनी केले, तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. अभिजीत दोड यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. सुधीर पाथरे, डॉ. मोनाली इंगळे, डॉ. राजेश आडे, आणि बहुसंख्य विद्यार्थीनी आभासी उपस्थित होत्या.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

**नवराष्ट्र**

# श्रीराम महिला महाविद्यालयात विजयदिन

**धामणगाव रेल्वे,**(वा.). स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संत गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजेश आडे, प्रा. नितीन बिहाडे व कार्यक्रम अधिकारी अभिजित दोड मंचावर उपस्थित होते. 1971 ला पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले होते. पूर्व पाकिस्तानमधील असंख्य नागरिक भारताच्या प्रदेशात आले होते. हे खूप मोठे संकट आले असताना तत्तकालीन



प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानविरुद्ध युद्धाची घोषणा केली. यामध्ये जवळपास चार हजार भारतीय सैनिकांना वीरमरण आले आणि 16 डिसेंबर 1971 रोजी युद्ध समाप्त होऊन बांग्लादेशाची निर्मिती झाली. या दिवसाची विजय आठवण म्हणून महाविद्यालयाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षांनी युद्धाची पार्श्वभूमी सांगितली तर अतिथींनी प्रत्यक्ष युद्ध का व कसे लढले गेले, त्याचे परिणाम याविषयी भाष्य केले. प्रास्ताविक प्रा. नितीन बिहाडे यांनी केले. संचालन धनश्री क्षीरसागर हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. योगेश काशीकर, डॉ. सुधीर पाथरे, डॉ. मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, राजेश नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, संतोष सिसोदे, कल्पना चव्हाण, प्रफुल्ल कांबळे आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Amravati Plus Edition
19 December 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com

**तरुण भारत**

# संविधान दिन आणि मुंबई हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली

◆ **धामणगाव रेल्वे, ३ डिसेंबर**

स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये नुकताच संविधान दिन आणि शहिदांना श्रद्धांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. सुधीर पाथरे तर अतिथी म्हणून प्रा. अभिजीत दोड आणि प्रा. नितीन बिहाडे मंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. नितीन बिहाडे यांनी केले. याच दिवशी महाविद्यालयांमध्ये दुसरा कार्यक्रम देखील घेण्यात आला. मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये अनेक निष्पाप भारतीय नागरिक, अधिकारी यांचे बळी गेले होते. त्या सर्वांना श्रद्धांजलीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. नीता केणे, डॉ. मोनाली इंगळे, प्रा. नितीन बिहाडे यांची होती. संचालन भाग्यश्री चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. राजेश आडे, डॉ. योगेश काशीकर, प्रा. सुवर्णा गोपे, अजय कुलकर्णी, राजकुमार भय्या, राजेश माळवे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

## कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक एड्सदिन




जरूड : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठद्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित जरूड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये १ डिसेंबर रोजी प्राचार्य डॉ. जी. आर. तडस यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबन क्लब व ग्रामीण रुग्णालय, वरूड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्सदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्याम जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनायक भटकर उपस्थित होते. प्रास्ताविकातून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत काळे यांनी जागतिक एड्सदिन साजरा करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी रेड रिबन कक्षाची स्थापना करण्यात आली. त्यात २० रासेयो स्वयंसेवकांचा समावेश करण्यात आला. याप्रसंगी प्रा. शिवाजी कानफाडे, डॉ. राम कुलसंगे, दिनेश राऊत, नीलेश खुरद, गजानन चव्हाण, राजेंद्र डबरासे, दिवाकर दुधकवरे, अर्चना राऊत, दीक्षिता वरखडे, प्रतिभा देशमुख, सानिका दवंडे, वैष्णवी दडघाये, आचल वर्मा, गणेश आहाके, प्रतीक हरले, अंकुश युवनाते, अजय टेकाम, दयाराम उईके, नेहाल जवणे, शेख फारुख, मिलिंद नागवंशी, आकाश मोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आचल वर्मा हिने तर आभार प्रदर्शन अंकुश युवनाते याने केले.

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात संविधानदिन



धामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये नुकताच संविधानदिन साजरा करण्यात आला. यावेळी २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यात शहिद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुधीर पाथरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अभिजीत दोड आणि प्रा. नितीन बिहाडे उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नितीन बिहाडे यांनी केले. त्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. त्यानंतर २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यात शहिद झालेल्या जवान व नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन भाग्यश्री चौधरी यांनी केले. यावेळी डॉ. राजेश आडे, डॉ. योगेश काशीकर, प्रा. सुवर्णा गोपे, अजय कुलकर्णी, राजेश माळवे, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, संतोष सिसोदे, कल्पना चव्हाण, प्रफुल्ल कांबळे आदी उपस्थित होते.

## श्रीराम कला महिला महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

धामणगाव रेल्वे ( वा. ) : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयांमध्ये भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष 2021 22 असल्यामुळे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे याचीच एक कडी म्हणून महाविद्यालयांमध्ये धामणगाव न्यायालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून या कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन महाविद्यालयांमध्ये नुकतेच करण्यात आले होते. महाविद्यालय विद्यार्थिनींच्या करीता महत्त्वाचे असलेले अनेक कार्यक्रम प्रत्येक वर्षी आयोजित करीत असते कार्यक्रमाला अध्यक्ष प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत अतिथी म्हणून न्यायाधीश राणे साहेब न्यायाधीश गोळे साहेब सरकारी वकील सिद्धकी साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या पूजनाने करण्यात आले त्यानंतर न्यायाधीश राणे यांनी या कायदेविषयक शिबिराची माहिती विद्यार्थिनींना दिली त्यांच्या मते भारतीय न्यायव्यवस्था आणि भारतीय कायदे भारतीय नागरिकांना न्याय मिळवून देण्यास सक्षम आहेत सोबतच न्यायमूर्ती गोळे साहेबांनी देखील आपले विचार मांडलेत अध्यक्षांनी कार्यक्रमाच्या आयोजनात बद्दलची रूपरेषा मांडली कार्यक्रमा करिता न्यायालयाचे सर्व कर्मचारी महाविद्यालया मधून कार्यक्रम अधिकारी प्रा अभिजित दौंड डॉ सुधीर पाथरे डॉ. मोनाली इंगळे डॉ. राजेश आडे डॉ नीता कॅने प्रफुल कांबळे विद्यार्थिनी उपस्थित होते.

## श्रीराम कला महीला महाविद्यालयामध्ये महिला मुक्ती दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी / ४ जानेवारी




**धामणगाव रेल्वे :** स्थानिक श्रीराम कला महीला महाविद्यालया मध्ये 3 जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंती महिला मुक्ती दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाविद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभागाकडून करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत सर तर अतिथी डॉ. मोनाली इंगळे प्रा.सुवर्ण घिपे मंचावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर कु. विद्या डायरे व बिंदोड यांनी स्वागत गीत म्हटले. नंतर सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी अभिजित दोड यांनी केले त्यानंतर महाविद्यालयांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर विद्यार्थिनींनी आपले विचार व्यक्त केले. यामध्ये कुमारी मानसी कुमारी मेश्राम कुमारी सराटे यांनी आपले विचार व्यक्त केले अध्यक्षांनी सावित्रीबाई फुले सोबत असलेल्या इतर महिला शिक्षकांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. तर वक्त्या घोपे मॅडम यांनी सावित्रीबाईंचा संपूर्ण जीवन कार्य व परिचय यावर भाष्य केले, तर अतिथी यांनी सावित्रीबाईंचे कार्य आजही महिलांकरिता कसे उपयुक्त आहे. यावर आपले विचार मांडले कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्रा. नितीन बिहाडे कुमारी पायल चौधरी धनश्री क्षीरसागर यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला डॉ.निता केने डॉ.योगेश काशीकर डॉ. राजेश आडे डॉ. सुधीर पाथरे डॉ अजय कुलकर्णी राजकुमार भैया राजेश मारवे शरद गावरले नागोराव पंचबुद्धे संतोष कल्पना चव्हाण प्रफुल कांबळे आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या बहुसंख्य स्वयंम सेविका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन कुमारी अश्विनी चौधरी तर आभार प्रदर्शन कुमारी बींदोड यांनी केले. महाविद्यालयांमध्ये अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जात असतात समाज सुधारक राष्ट्रपुरुष यांच्या विचारांपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी हा कार्यक्रम मागचा हेतू उद्देश असतो.

आपल्या हक्काचे प्रतीक बातमी
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र तोडे
भावपूर्ण श्रद्धांजली
भारताचे पहिले सीडीएस बीपीनसिंह रावत
गुरुवार दि. ९ डिसेंबर २०२१

# आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन

धा.रेल्वे दि. ९ | प्रज्योत पहाडे



स्थानिक आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य या विषयावर कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे आयोजित करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांच्यात जाणीव व जागृती निर्माण व्हावी हा कार्यशाळा घेण्यामागील उद्देश होता. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गाडोळे तर प्रमुख वक्ते म्हणून श्रीराम महिला कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत लाभले होते. डॉ. नंदकिशोर राऊत यांनी आपल्या वक्तव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, संविधानिक, कार्याचा सविस्तर आढावा घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गाडोळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अतिशय महान असून त्यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात बोध घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर बारापात्रे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. फुरकान पठाण तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र बारुडकर यांनी केले.

कार्यशाळेला महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. दिपक शुंगारे, प्रा.डॉ. संजय पाटील, प्रा. अमोल बंड, प्रा.डॉ. पुनम गहूकर, सम्यक दहाट, कल्याणी कडू, रवि बढीये यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




नवराष्ट्र

# मतदार जनजागृती, नवीन मतदार नोंदणी अभियान




धामणगाव रेल्वे (वा.).येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये प्रत्येक वर्षी नवमतदार नोंदणी व मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत असते. यावर्षी सुद्धा राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये नोंदणी आणि मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत दत्तक ग्राम आर्वी येथे मतदान जनजागृती करण्यात आली. सोबतच याकरिता या गावांमधील विद्यार्थिनी नवमतदार उपस्थित होते. शिवाय प्रत्येक वर्षामध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थिनी यांचे वय अठरा एक जानेवारी 2022 पर्यंत होणार आहे. अशा सर्व विद्यार्थिनींची नवीन मतदार नोंदणी महाविद्यालयांमध्ये करण्यात येणार आहे. आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. आपल्या देशामधील बहुसंख्य नागरिकांचा लोकशाहीवर विश्वास आहे आणि तो विश्वास अधिक दृढ व्हावा याकरिता मतदारांनी देखील अधिकाधिक प्रमाणात मतदान करणे आवश्यक आहे. आणि म्हणूनच प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा याकरिता मतदान जनजागृती या विभागाद्वारे केली जात असते. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, श्रीराम शिक्षण संस्थेचे सचिव घनश्याम मेश्राम, राज्यशास्त्र विभाग प्रमुख नितीन बिहाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अभिजित दौड, डॉ. योगेश काशीकर, नागोराव पंचबुद्धे, संतोष कल्पना चव्हाण, शरद गावरले, संतोष सिसोदे, इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मतदार व नवमतदार उपस्थित होते.

Amravati Plus Edition
26 October 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com

पुण्य नगरी

पुण्य नगरी

# धामणगाव रेल्वे येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयात भूगोलदिन



धामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयात नुकताच भूगोलदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगेश काशीकर, डॉ. मोनाली इंगळे, प्रा. अभिजित दोड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत गाडगेबाबा, स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भूगोल दिनानिमित्त व्याख्यान पार पडले. कार्यक्रमाला डॉ. सुधीर पाथरे, डॉ. राजेश आडे, प्रा. नितीन बिहाडे, प्रा. सुवर्णा गोपी, डॉ. नीता केने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दीक्षा बुराडे तर आभार प्रदर्शन धनश्री क्षीरसागर यांनी केले.

Smart Amravati
Page No.2 January 26, 2022

# श्रीराम कला महिला महाविद्यालयांमध्ये वन्यजीव सप्ताह




धामणगाव रेल्वे दि. १३ : येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात करिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ न. ऊ.राऊत कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक अभिजीत रोड अतिथी डॉ. राजेश आडे वक्ते डॉ सुधीर पाथरे उपस्थित होते यावेळी संत गाडगेबाबा

समाजाला होईल.म्हणून या सर्वांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावं या हेतूने या सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयात द्वारे करण्यात आले यावेळी महाविद्यालयाकडून सर्व वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले विद्यार्थिनींना देखील अशाच प्रकारचा संदेश यावेळी देण्यात आला महाविद्यालय नेहमीच अशा विविध प्रकारचे आयोजन करीत असते म्हणूनच महाविद्यालयांमध्ये

Allow **Samsung capture** to access photos, media and files on your device?

Allow

Deny

www.dainikhindusthan.com हिंदु

# Human Rights Day Organized

Dhamangaon Railway .. December 11 : was celebrated as National Human Rights Day at the local Shriram Kala Mahila Mahavidyalaya. The event was organized by the Department of Political Science and the Department of National Service Planning. Dr.Sudhir Pathare as President and Dr. Rajesh Ade as Program Officer, prof. Abhijeet Dod and prof. Dr. Nitin Bihade was present on the stage at the beginning of the program. The image of Babasaheb Ambedkar was worshiped. After that, all the guests who benefited from the event were welcomed with a bouquet of flowers. The program was introductory by Nitin Bihade, Head Professor, Department of Political Science. Dr. Ade presented his views on human rights in the Indian Constitution. Professor Daund read out the Universal Declaration of Human Rights to the students, while the President expressed his views on global human rights and the Indian Constitution. The program was conducted by Ku. Suvarna Headway and thanks given by ku Dhanashree Shirsagar. In

***Initiative of Shriram Kala Mahila Mahavidyalaya.***



the program Dr. Yogesh Kashikar, Dr. Nita Kene, Dr. Monali Ingle, Prof. Ajay Kulkarni, Prof. Suvarna Ghope, Rajkumar Bhaiya, Rajesh Marve, Santosh Shisode, Nagarao Panchbuddhe, Sharad G Warle, Kalpana Chavan, Prafulla Kamble, Neha Sawant, Achal Sawant, Pooja Thakeray and most of the college students were present.

# श्रीराम कला महिला महाविद्यालयात विजयदिन



घामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून विजय दिनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.नंदकिशोर राऊत प्रमुख पाहुणे म्हणून, डॉ. राजेश आडे, प्रा. नितीन बिहाडे, प्रा .अभिजित दोड व्यासपीठावर उपस्थित होते. सन १९७१ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले होते. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी पाकिस्तान विरुद्ध युद्धाची घोषणा केली. त्यामध्ये जवळपास चार हजार भारतीय सैनिकांना वीरमरण आले आणि १६ डिसेंबर १९७१ ला युद्ध समाप्त होऊन बांगलादेश ची निर्मिती करण्यात आली. या दिवसाची विजय आठवण म्हणून हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.नितीन बिहाडे, संचालन धनश्री क्षीरसागर हिने, तर आभार प्रदर्शन प्रतिक्षा चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. योगेश काशीकर, डॉ.सुधीर पाथरे, डॉ. मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, राजेश नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, संतोष सिसोदे, कल्पना चव्हाण, प्रफुल्ल कांबळे आदी उपस्थित होते.

# श्रीराम कला महिला महाविद्यालयात रासेयो दिन

धामणगाव रेल्वे दि. २९ : येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयात नुकताच राष्ट्रीय सेवा योजना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ नंदकिशोर राऊत अतिथी डॉ सुधीर पाथरे कार्यक्रम अधिकारी अभिजीत दोड. मंचावर उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रम अधिकारी यांनी संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना याविषयी माहिती दिली अतिथीनी राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थ्यांनी या विषयावर विचार मांडले तर अध्यक्षांनी महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना च्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने देखील विद्यार्थिनींना मिळाला आणि विद्यार्थ्यांनीचा ऑनलाइन सहभाग या कार्यक्रमांमध्ये घेण्यात आला त्यांना राष्ट्रीय सेवा योजना याची संपूर्ण माहिती या कार्यक्रमाद्वारे देण्यात आली गेली. दोन वर्ष संपूर्ण देश



कोरोना च्या प्रादुर्भावामुळे संकटात सापडलेला आहे अशा वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आपले सामाजिक दायित्व म्हणून जनजागृतीचे कार्य आजही करीत असताना दिसतात आणि हेच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सेवा योजनेचे यश म्हणावे लागेल कुठल्याही सामाजिक संकटाच्या वेळी ह्या विद्यार्थीनी जनजागृती आणि सेवेचे कार्य करीत असतात हा त्यांच्या कार्याचा वारसा ते आयुष्यभर जगतात आणि याबद्दल उत्तम भारताच्या नागरिकांची निर्मिती होत असते म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व अधोरेखित होते. कार्यक्रमाच्या यशाचे करिता प्राध्यापक नितीन बिहाडे या मयुरी गबने उज्वला मेश्राम भाग्यश्री मेश्राम यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला डॉक्टर राजेश आडे डॉक्टर योगेश काशीकर डॉक्टर मोनाली इंगळे डॉ निता केणे अजय कुलकर्णी राजकुमार भैया राजेश मारवे संतोष शिसोदे शरद गवारले नागोराव पंचबुद्धे कल्पनाताई चव्हाण आणि प्रफुल्ल कांबळे उपस्थित होते.

महामानवाला अभिवादन, ७३ रक्तदात्यांनी केले रक्तदान

# धामणगाव रेल्वे येथे रक्तदानातून आदरांजलीची दशकपूर्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

धामणगाव रेल्वे : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी नगर परिषद प्रांगणात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ७३ रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहताना महापरिनिर्वाण दिन समितीचे पदाधिकारी.

महापरिनिर्वाण दिन समिती गेल्या १० वर्षांपासून ६ डिसेंबर रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रक्तदान करून अनोखी आदरांजली वाहत आहे. यावर्षीदेखील समितीकडून स्थानिक नगर परिषद प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तसंकलन अमरावती येथील बालाजी ब्लड बँकेच्या चमूने केले. कार्यक्रमादरम्यान दत्तापूर पोलिसांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. निवासी नायब तहसीलदार आशिष वीर, मंगरूळ दस्तगीरचे ठाणेदार सूरज तेलगोटे यांनीदेखील कार्यक्रमात हजेरी लावून आदरांजली वाहिली.

आयोजनाकरिता समितीचे अनिल वहिले, प्रवीण हेंडवे, राजेंद्र बोरकर, सुनील ढाणके, मंगेश सोनवणे, अशोक मोहोड, संजय तुपसुंदरे, सुनील थूल, छगन जाधव, प्रदीप भुसारी, चेतन कोठारी, मंगेश भुजबळ, छंदक हगवणे, प्रशांत मून, भीमराव सहारे, आशिष काळबांडे, किशोर मेश्राम, राजेंद्र बुटे, आशिष हांडे, संजय पांडे, आनंद रॉय, अमोल हिवरकर, अनूप पुरोहित, पवन अग्रवाल, नंदू ढोले आदींची उपस्थिती होती.

# Victory Day celebrations at Shriram Women's College

**Dhamangaon Railway:** Vijay Din was celebrated with enthusiasm by the National Service Planning Department at the local Shriram Kala Mahila Mahavidyalaya. On this occasion, the images of Sant Gadge Baba and Dr. Babasaheb Ambedkar were worshiped. Principal Dr. Nandkishore Raut presided over the function and Dr. Rajesh Ade Prof. Nitin Bihade Program Officer Prof. Abhijit Dod was present on the stage. In 1971, Pakistan invaded




India. Numerous East Pakistani nationals came to Indian territory. In the midst of this great crisis, the then Prime Minister Indira Gandhi declared war on Pakistan. Nearly four thousand Indian soldiers were killed and Bangladesh was formed on 16 December 1971. It was a day that every Indian should be proud to commemorate the victory and that is why this event was organized by this department of the college. While the President explained the background of the war, the guests commented on why and how the actual war was fought and the consequences. The program was conducted by Kumari Dhanashree Shirsagar and the vote of thanks was given by Pratiksha Chaudhary. Dr. Yogesh Kashikar, Dr. Sudhir Pathre, Dr. Monali Ingle, Ajay Kulkarni, Rajkumar Bhaiya, Rajesh Nagarao, Panchbuddhe, Sharad Gawarle, Santosh Sisode, Kalpana Chavan, Praful Kamble and the majority of the students in the college were present.

नवराष्ट्र


अभिवादन — सामाजिक उपक्रमातून डॉ. आंबेडकर यांना आदरांजली

# जिल्ह्यात विविध ठिकाणी महापरिनिर्वाण दिन



अमरावती.

### कुऱ्हा हायस्कूल




### सिद्धार्थ सार्वजनिक वाचनालय, विहीगाव



### टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार





### मंगरूळ चवाळा

### श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय



### धामणगाव रेल्वे

### श्रीराम महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

### बहुजन समाज पार्टी, अंजनगाव सुर्जी

### भंडारज येथे अभिवादन

### वरूड येथे रक्तदान शिबिर



Amravati Plus Edition
08 December 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

|| श्रीकृष्णम् वंदे जगद्गुरुम् ||

# अध्ययन समाचार

आता रोज रहा अपडेट!

संपादक : जितेंद्र रोडे

कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805

भ्रमणध्वनी : 9422158005
दूरध्वनी : 07223-222005

jitendrarode77@gmail.com
Adhayayn Samachar

शनिवार दि. १८ डिसेंबर २०२१




## श्रीराम महिला महाविद्यालय मध्ये विजय दिन उत्सहात साजरा

**धा.रेल्वे दि.१८ प्रज्योत पहाडे**




स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग कडून विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी संत गाडगे बाबा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ नंदकिशोर राऊत प्रमुख पाहुणे म्हणून डॉ राजेश आडे प्रा. नितीन बिहाडे कार्यक्रम अधिकारी प्रा अभिजित दोड मंच्यावर उपस्थित होते. 1971 ला पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले होते असंख्य पूर्व पाकिस्तानमधील नागरिक भारताच्या प्रदेशात आले होते हे खूप मोठे संकट आले असतांना तत्तकालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी पाकिस्तान विरुद्ध युद्धाची घोषणा केली यामध्ये जवळपास चार हजार भारतीय सैनिकांना वीरमरण आले आणि 16 डिसेंबर 1971 ला समाप्त होऊन बांगलादेश ची निर्मिती करण्यात आली. या दिवसाची विजय आठवण म्हणून प्रत्येक भारतीय भारतीयाला अभिमान वाटावा असा तो दिवस होता आणि म्हणूनच महाविद्यालयाच्या या विभागाद्वारे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अध्यक्षांनी युद्धाची पार्श्वभूमी सांगितली तर अतिथींनी प्रत्यक्ष युद्ध का व कसे लढले गेले त्याचे परिणाम याविषयी भाष्य केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक नितीन बिहाडे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन कुमारी धनश्री शिरसागर हिने केले तर आभार प्रदर्शन प्रतिक्षा चौधरी यांनी केले कार्यक्रमाला डॉ. योगेश काशीकर डॉ.सुधीर पाथरे डॉ मोनाली इंगळे अजय कुलकर्णी राजकुमार भैया राजेश नागोराव पंचबुद्धे शरद गवारले संतोष सिसोदे कल्पना चव्हाण प्रप्फुल कांबळे आणि महाविद्यालयांमधील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या हे महाविद्यालय नेहमीच प्रेरणादायी असणारे कार्यक्रम घेत असते.

तरुण भारत

## श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये वन्यजीव सप्ताह

**◆ धामणगाव रेल्वे, १० ऑक्टोबर**

येथील श्रीराम कला महिला महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत, कार्यक्रम अधिकारी प्रा. अभिजित रोडे, अतिथी डॉ. राजेश आडे, वक्ते डॉ. सुधीर पाथरे उपस्थित होते.

यावेळी वन्यजीव आणि मानव या विषयावर मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. मानवी जीवनाबरोबरच वन्यजीव देखील या निसर्गाचाच एक भाग आहेत. अनेक वन्यजीव आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचा परिणाम नक्कीच मानवी जीवन आणि संपूर्ण पर्यावरणावर होणार आहे.




कार्यक्रमात उपस्थित मान्यवर

याची अपरिमित हानी मानव समाजाला होईल. म्हणून या सर्वांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे या हेतूने या सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयाद्वारे करण्यात आले असल्याचे मान्यवरांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाकडून सर्व वन्यजीवांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

विद्यार्थिनींना देखील अशाच प्रकारचा संदेश यावेळी देण्यात आला. महाविद्यालय नेहमीच अशा विविध प्रकारचे आयोजन करीत असते; म्हणूनच महाविद्यालयामध्ये शैक्षणिक कामासोबतच इतर देखील सामाजिक उपक्रम होत असतात. कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. नितीन बिहाडे, प्रा. डॉ. योगेश काशीकर, डॉ. नीता केने, डॉ. मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजकुमार भैय्या, कल्पना चव्हाण, शरद गव्हाणे, प्रफुल्ल कांबळे इत्यादी उपस्थित होते. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## श्रीराम महाविद्यालय में हुआ कानून विषयक शिविर



**संवाददाता, 26 नवंबर**

**धामणगांव रेलवे**- स्थानीय श्रीराम कला महिला महाविद्यालय में भारतीय आजादी का अमृत महोत्सव वर्ष 2021-22 निमित्त विविध कार्यक्रमों का आयोजन जारी है. इसी श्रृंखला में महाविद्यालय में धामणगांव न्यायालय तथा राष्ट्रीय सेवा योजना विभाग की ओर से प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत की अध्यक्षता में महाविद्यालय में कानून विषयक मार्गदर्शन शिविर का हाल ही में आयोजन किया गया था. इस कार्यक्रम में अतिथि न्या. राणे साहब, न्या. गोळे साहब तथा सरकारी वकील सिद्दीकी साहब उपस्थित थे. संत गाडगेबाबा का पूजन कर कार्यक्रम आरंभ किया गया. पश्चात न्या. राणे ने छात्राओं को कानून विषयक शिविर की जानकारी दी. भारतीय न्याय व्यवस्था तथा भारतीय कानून भारतीय नागरिकों को न्याय दिलाने के लिए सक्षम है, ऐसे विचार उन्होंने व्यक्त किये. न्या. गोळे ने भी अपने विचार रखे. प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत ने कार्यक्रम के आयोजन के बारे में रूपरेखा व्यक्त की. बता दें कि महाविद्यालय द्वारा छात्राओं के लिए महत्वपूर्ण रहने वाले अनेक कार्यक्रम हर वर्ष आयोजित किये जाते हैं. इस कार्यक्रम में न्यायालय के सभी कर्मचारी साथ ही महाविद्यालय से कार्यक्रम अधिकारी प्रा. अभिजीत दौड, डॉ. सुधीर पाथरे, डॉ. मोनाली इंगळे, डॉ. राजेश आडे, डॉ. नीता कॅने, डॉ. योगेश काशीकर, अजय कुळकर्णी, राजकुमार भैया, राजेश मारवे, नागोराव पंचबुध्दे, शरद गवरले, संतोष चव्हाण, प्रफुल्ल कांबले उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन प्रा. नितिन बिहाड़े ने व आभार प्रा. अभिजीत दौड़ ने माना.